



“हे चैतन्य पुत्रा! माझा आद्य उपदेश हा आहे: एक पवित्र दयाळू आणि तेजस्वी हृदय धारण कर...”




"न्यायाच्या मार्गावर तुम्ही चला कारण, सत्यत:, हाच खरा सन्मार्ग आहे."



“हे मित्रा! तुझ्या हृदयाच्या बागेत प्रेमाच्या गुलाबाशिवाय दुसरे काही रुजवू नकोस... ”



“सत्यवादिता सर्व मानवी सद्‌गुणांचा पाया आहे.”




“दातृत्व व औदार्य माझे गुणधर्म आहेत; त्याचे कल्याण असो, जो माझ्या सद्‌गुणांनी स्वतःस भूषवितो.”



“तो आशीर्वादित आहे जो स्वत: आधी आपल्या बांधवास प्राधान्य देतो.”



“हे मानव पुत्रा! तुझ्या हृदयातील आनंदाने तू हर्षित हो म्हणजे माझ्या मिलनास
आणि माझे सौंदर्य परावर्तित करण्यास तू सुपात्र होशील.”



“आपण सदैव आपली सत्यनिष्ठा आणि प्रामाणिकता प्रदर्शित करावी...”



“हे मानव पुत्रा! मी तुला भेट देण्याची कृपा करावी म्हणून तू माझ्यासमोर विनम्र हो.”



“तुम्ही आनंदी रहा. तुम्ही कृतज्ञ रहा. परमेश्वराचे आभार मानण्यासाठी उद्युक्त व्हा, जेणेकरून तुमची कृतज्ञता ईश्वराच्या औदार्याची वाढ निर्माण करण्यास कारणीभूत ठरेल.”



“...क्षमाशीलता व दया आणि ते जे ईश्वराच्या प्रियजनांच्या अंत:करणांना प्रसन्न करते ती तुमची आभूषणे असोत.”



"लोकहो, सत्यवादितेने आपली वाणी अलंकृत करा, आणि
प्रामाणिकतेच्या आभूषणाने आपले आत्मे विभूषित करा."



"ईश्वराचे साम्राज्य निष्पक्षता व न्याय आणि सोबतच प्रत्येक जीवित आत्म्याविषयी कृपा, करूणा व दयाभाव यावर उभारलेले आहे. म्हणून संपूर्ण मानवजातीशी दयाळूपणे वागण्याचा मन:पूर्वक प्रयत्न करा."




"हे जाण की तुझी खरी आभूषणे ईश्वराच्या प्रेमात आणि त्याच्याशिवाय अन्य सर्वांपासूनच्या अनासक्तीमध्ये समावली आहे..."




“ईश्वराने जे काही बहाल केले त्याचा स्वीकार करणे आणि ईश्वराने जे काही आदेशित केले आहे त्यात समाधान मानने हा सर्व गौरवाचा स्त्रोत आहे.”



“धन्य आहे तो मनुष्य जो सर्व मानवाशी अत्यंत दयेच्या व प्रेमाच्या भावनेने समरस होतो.”



“ईश्वराच्या शब्दाला उन्नत करणे आणि त्याच्या प्रेमामध्ये दृढता असणे,
हे धैर्य आणि शक्तीचे स्त्रोत आहेत.”




“तुमची परमेश्वरावरील निष्ठा कधीही गमावू नका. तुम्ही नेहमी आशावादी असा कारण ईश्वराचे कृपाप्रसाद मानवाप्रत प्रवाहित होणे कधीही थांबत नाहीत.”



“विश्वासपात्रता हा लोकांना शांती आणि सुरक्षेकडे नेणारा महानतम प्रवेशद्वार आहे.”



“हे लोकहो, परमेश्वरी प्रेम–अग्नीच्या उष्णतेने तुम्ही प्रदीप्त व्हा,
जेणेकरून तुम्ही इतरांची अंत:करणे प्रदीप्त करू शकाल.”




“हे अस्तित्व पुत्रा! तू माझा दीपक आहेस, आणि माझा दिव्य प्रकाश तुझ्याठायी आहे. माझ्या दिव्य प्रकाशाने तू प्रकाशित हो आणि माझ्याशिवाय अन्य कोणासही शोधू नकोस.”



“तो विश्वासू आनंदी आहे ज्याने उच्च प्रयत्नांचा पोशाख परिधान केला आहे
आणि जो या धर्माची सेवा करण्यास पुढे सरसावला आहे.”



"सत्यतः, जे संयमाने दुःखे सहन करतात, त्यांना परमेश्वर अधिक फळ देतो."



"तुझ्या स्वामीच्या धर्मकार्यात तू निश्चल राहिल्यास तुझे पद अत्युच्च होईल."